प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (१०० टक्के केंद्र पुरस्कृत - राज्य व्यवस्थापित-PMKVY ३.० - CSSM-) या योजनेंतर्गत अनुसूचित जाती घटकाचा निधी वितरित करण्याबाबत...........

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: कौविउ-२०२२/प्र.क्र.११३/कौशल्य -१**
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १४ मार्च, २०२३

**वाचा :**

१) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक १५/०७/२०१५.

२) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक २०/०५/२०१६.

३) केंद्र शासनाच्य कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने विशेष प्रकल्प (Special Project) व केंद्रीय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) संदर्भात निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना दिनांक २५/०१/२०१७.

४) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक २८/०२/२०१७.

५) उप संचालक, SNP Division/Wing II, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक बी-१२०१२/३७/२०१७-एसएनपी, दिनांक २५/०९/२०१७.

६) प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-१ महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्रमांक खं.वि./चा-१/कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/युओआर-८८/२०१७-१८/७५०, दिनांक २२/११/२०१७

७) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२३७/अभियान-१, दिनांक २६/१२/२०१७.

८) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१, दिनांक २७/०३/२०१८.

९) संचालक, एमएसडीई/भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक F.No. B-१२०११/०१/२०१६ -SDE, Part II/दिनांक ०१/०४/२०२०.

१०) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१, दिनांक १२/११/२०२०.

११) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१, दिनांक १४/०१/२०२१

१२) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१, दिनांक २३/०३/२०२१.

१३) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाचे पत्र क्र. SCH-११/२४/२०२१-SNP/दिनांक २४ मे, २०२१

१४) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१, दिनांक २१ जून, २०२१

१५) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०२१/प्र.क्र.८२/कौशल्य-१, दिनांक १३ जानेवारी, २०२२.

१६) आदिवासी विकास विभाग/शासन निर्णय क्रमांक : बीयुडी-२०२२/प्र.क्र.११(भाग-१)/का-६/ दिनांक ०६ मार्च, २०२३

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाने प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ३.० (१०० टक्के केंद्र पुरस्कृत, राज्य व्यवस्थापित-PMKVY ३.० - CSSM) या योजनेचा तिसरा टप्पा राबविण्यास सं.क्र. १३ येथील पत्रान्वये मान्यता दिली असून त्याअंतर्गत रु. ६,०१,५०,०००/- इतका निधी राज्य शासनास प्रवर्गनिहाय वितरीत केला आहे. सदर निधीपैकी अनुसूचित जमाती प्रवर्गाचा रु.५१.७३ लाख इतका निधी आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना Public Financial Management System (PFMS) प्रणाली व अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व सनियंत्रण प्रणालीद्वारे वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब नस्तीवर विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

"प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ३.०" (१०० टक्के केंद्र पुरस्कृत, राज्य व्यवस्थापित-PMKVY ३.० - CSSM) या योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गाचा रु.५१.७३ लाख इतका निधी सं.क्र. १६ अन्वये आदिवासी विकास विभागाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागास वितरीत केला असून सदर निधी आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना Public Financial Management System (PFMS) प्रणाली व अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व सनियंत्रण प्रणालीद्वारे वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्य शासनाने या योजनेसाठी वितरीत केलेला निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी कोषागारामधून आहरीत करून मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांना खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात यावा. याकरिता आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" तसेच सहायक संचालक (लेखा) कोकण भवन यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. देश पातळीवर कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने संदर्भाधिन अधिसूचनेद्वारे सामायिक मार्गदर्शन सूचना निर्गमित केलेल्या आहेत. कार्यान्वयिन यंत्रणेने सामायिक मार्गदर्शन सुचानांमधील तरतुदींनुसार अथवा त्यामध्ये केंद्र शासनाने वेळोवेळी सुधारित केलेल्या तरतुदीनुसार तसेच ज्या उपक्रम/प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला आहे त्याच उपक्रम/प्रकल्पासाठी खर्च करणे बंधनकारक राहील. याबाबतचे लेखे स्वतंत्र ठेवून

खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व इतर तपशील केंद्र शासनाच्या संबधीत मंत्रालय आणि शासनाकडे पाठविण्याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांनी घ्यावी. सदर लेखे महालेखापाल यांना लेखा तपासणीच्यावेळी उपलब्ध करुन देण्यात यावेत तसेच सदर निधी खर्च करताना वित्तीय अधिकार नियमांचे तसेच वित्त, नियोजन आणि सामाजिक न्याय विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना/नियम/अटी/शर्ती यांचे पालन करण्यात यावे.

४. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक १३५-२०२३/व्यय-१४, दिनांक १४.०२.२०२३ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२३०३१५११२७५०००३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MITHUN MOHANRAO SALUNKHE

Digitally signed by MITHUN MOHANRAO SALUNKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTERPREUNERSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=eb410b645758d07ea6303743e3a96f12f7b5ea5c78305aa3546f1b05a4d188d9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=928224E8C07F06F0A63241EEC16360F9961117B3DFDA771ED6746D1433B5EA7A, cn=MITHUN MOHANRAO SALUNKHE
Date: 2023.03.15 11:32:41 +05'30'

**( मिथुन साळुंखे )**

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत :-**

१. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, मुंबई.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
५. महालेखापाल कार्यालय, महाराष्ट्र, १/२ मुंबई/नागपूर.
६. सहायक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, मुंबई.
७. कोषागार कार्यालय, मुंबई/नवी मुंबई.
८. प्रशा-३, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. निवड नस्ती (कौशल्य-१).